# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८

## मा. ह प्रभाग मासीक सभा

### कार्यपत्रिका क्रमांक - ३

### (स भा वृत्तां त)

दिनांक – ७/०६/२०१८ वेळ. दु. १२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. ह प्रभाग समितीची **मासिक सभा** गुरुवार दि. ७/०६/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता ह क्षेत्रीय कार्यालयाचे “पं.दीनदयाळ उपाध्याय सभागृहामध्ये” आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य / नगरसदस्या उपस्थित होते.

| अ.क्र. | सन्मा.सदस्य नांव | |
|---|---|---|
| 1 | मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत | सभापती |
| 2 | मा.शाम गणपतराव लांडे | सदस्य |
| 3 | मा.आशा धायगुडे – शेंडगे | सदस्या |
| 4 | मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत | सदस्या |
| 5 | मा.रोहित (आप्पा) सुदाम काटे | सदस्य |
| 6 | मा.राजापुरे माधवी राजेंद्र | सदस्या |
| 7 | मा.चौगुले सीमा दत्तात्रय | सदस्या |
| 8 | मा.संतोष बबन कांबळे | सदस्य |
| 9 | मा.उषा उर्फ माई मनोहर ढोरे | सदस्या |
| 10 | मा.अनिकेत राजेंद्र काटे | स्विकृत सदस्य |
| 11 | मा.कुणाल दशरथ लांडगे | स्विकृत सदस्य |
| 12 | मा.संजय गुलाब कणसे | स्विकृत सदस्य |

याशिवाय श्रीम.आशा राऊत प्रशासन अधिकारी तथा क्षेत्रीय अधिकारी, श्री.शिरीष पोरेड्डी (उप.अभियंता स्था), श्री.दिलीप धुमाळ (उप.अभियंता वि), श्री.कोंडे ए. बी. (उप.अभियंता जनि), डॉ. शंकर जाधव (उप अधिक्षक ycm), श्री.डी.एस.सासवडकर (सहा. आरोग्याधिकारी), श्री.जे.व्ही.पटेल (उद्यान निरीक्षक), श्री.शिरसाठ आर.डी. (उद्यान सहाय्यक), श्री.चंद्रकांत मोरे (उद्यान सहाय्यक), श्री.प्रदीप बाराथे (लेखाधिकारी), श्री. लांडगे संतोष (उद्यान सहाय्यक), श्री. अरुण दगडे (पशुवैद्यकिय अधिकारी), श्री.मोरे ए.ए. (क.अ. स्था.उद्यान), श्री. निलेश दाते (क.अ.पापु), श्री.अमर जाधव (क.अ.पापु), श्री.रमेश जिंतीकर (क.अ.जनि), श्रीम. प्रिती यादव, श्री.समीर दळवी (क.अ.वि), श्री.दांगडे सुनिल (क.अ.स्था), श्री.देवकर जे.डी.(क.अ.झानिपू स्था), श्रीम.जयश्री सांळवे (क्रीडा पर्यवेक्षक), श्री.सानप एस.एस. (क.अ.स्था), श्री.महेंद्र देवरे (क.अ.स्था),

श्री.सुनील चौहान (आ.नि), श्री.संजय मानमोडे (आ.नि), श्रीम.रश्मी तुंडलवार (आ.नि), श्री.इंगेवाड एस.एस. (आ.नि), श्री.उध्दव डवरी (आ.नि) इ. अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.सभापती –** उपस्थित सन्मा.सदस्य अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

अ) दि. ३/०५/२०१८ रोजी झालेल्या मासिक सभेचा (कार्यपत्रिका क्र.२) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

**उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले –**

विषय क्र.१) प्रभाग क्र. ३२ जुनी सांगवी येथील अहिल्याबाई पुतळा येथे दुरुस्ती व सुशोभिकरण करणेबाबत- मा.उषा उर्फ माई ढोरे व मा. आशा धायगुडे – शेंडगे यांचा प्रस्ताव

विषय क्र.२) प्रभाग क्र.३१ मधील नवी सांगवी भागातील गणेश नगर आणि स्वामी विवेकानंद नगर येथील रस्त्यांचे नामफलक लावणेबाबत - मा. राजापुरे माधवी व मा.सिमा चौगुले यांचा प्रस्ताव

विषय क्र.३) प्रभाग क्र.३० ( दापोडी, फुगेवाडी,कासारवाडी ) कासारवाडी येथील जलतरण तलाव येथे C.C.T.V. कॅमेरे बसविणेबाबत - मा. रोहित काटे व मा. स्वाती (माई) काटे यांचा प्रस्ताव

**यानंतर सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले –**

ठराव क्र - ८ विषय क्र - १
दि - ७/६/२०१८ विभाग – स्थापत्य
सुचक - मा. उषा उर्फ माई ढोरे अनुमोदक - मा. आशा धायगुडे – शेंडगे
संदर्भ - मा. उषा उर्फ माई ढोरे, मा. आशा धायगुडे - शेंडगे यांचा दि. ७/ ६/ २०१८ चा प्रस्ताव

**प्रभाग क्र.३२ जुनी सांगवी येथील दुरुस्ती व सुशोभिकरण करणेकामी –**

१. अहिल्याबाई पुतळा परिसरात जमिनीपासून चार फुट बॅरिकेट करणे २. अहिल्याबाई पुतळयामागील भिंत मागे घेवून उंच करणे ३. अहिल्याबाई पुतळयावर आधुनिक पध्दतीची लाईट व्यवस्था व C.C.T.V. कॅमेरे बसवावे. ४. अहिल्याबाई पुतळयाच्या परिसरात कायमस्वरुपी मनपाचे कर्मचारी नियुक्त करुन तेथील परिसर स्वच्छ करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

----

ठराव क्र - ९ विषय क्र - २
दि - ७/६/२०१८ विभाग – स्थापत्य
सुचक - मा. राजापुरे माधवी अनुमोदक – मा.सिमा चौगुले
संदर्भ - मा.राजापुरे माधवी व मा.सिमा चौगुले यांचा दि. ७ / ६ / २०१८ चा प्रस्ताव

**प्रभाग क्र.३१ मधील नवी सांगवी भागातील गणेश नगर आणि स्वामी विवेकानंद नगर येथील रस्त्यांचे नामफलक पुढीलप्रमाणे** – १. गणेश नगर रस्ता क्र.१ नवी सांगवी २. गणेश नगर रस्ता क्र.२ "महात्मा फुले मार्ग" नवी सांगवी ३. गणेश नगर रस्ता क्र.३ नवी सांगवी ४. स्वामी विवेकानंद सोसायटी नवी सांगवी ५. स्वामी विवेकानंद नगर नवी सांगवी तरी सदर नांवे असलेले नामफलक लावणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

-----

ठराव क्र - १० विषय क्र - ३
दि - ७/६/२०१८ विभाग – स्थापत्य
सुचक - मा.रोहित काटे अनुमोदक – मा.स्वाती (माई) काटे
संदर्भ - मा. रोहित काटे, मा.स्वाती (माई) काटे यांचा दि. ७/६/२०१८ चा प्रस्ताव

प्रभाग क्र.३० मधील कासारवाडी येथील जलतरण तलाव येथे वारंवार छेडछाडीची प्रकरणे घडतात त्याला C.C.T.V. कॅमेरे बसविल्यामुळे आळा बसेल व **दापोडी परिसरातील** (S.M.S. कॉलनी, आझाद चौक, ११ नं.बस स्टॉप, शितळादेवी चौक, हुतात्मा भगतसिंग शाळा, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर, अल्बन चौक) **फुगेवाडी परिसरातील** (नवमहाराष्ट्र चौक, फुगेवाडी मनपा शाळा, विठ्ठल रुक्मिणी मंदिर परिसर) तसेच **कासारवाडी परिसरातील** (शास्त्रीनगर चौक,गुलिस्तान नगर, हिराबाई झोपडपट्टी, वरुण हॉटेल परिसर,कासारवाडी मनपा शाळा) वरील ठिकाणी C.C.T.V. कॅमेरे बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वांनुमते मान्य झाला.

---

यानंतर मा.सभापती यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

Kamble

**(मा.कांबळे अंबरनाथ चंद्रकांत )**
सभापती, ह प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

जा.क्र. हक्षे /१०/ कावि / ११३ / २०१८
दिनांक – २१ /०६ / २०१८

**प्रशासन अधिकारी**
**तथा**
**सचिव (सभाशाखा)**
ह प्रभाग समिती

प्रत – सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर